# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. १८४४/२०२०/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. एकबाल नजीर अन्सारी,<br>रा. ८००/५०, किल्ला रविवार वार्ड,<br>मालगाव,ता.मालगाव,जि. नाशिक | पुरवठा अव्वल कारकुन,<br>धान्य वितरण अधिकारी कार्यालय,<br>मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक | धान्य वितरण अधिकारी,<br>धान्य वितरण अधिकारी कार्यालय,<br>मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक - १०/०८/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१/०६/२०२० | ०१/०६/२०२० | ०१/०६/२०२० | २७/०७/२०२० | २७/०७/२०२० | २५/०८/२०२० |

अपिलार्थी यांनी दि. ०७/१०/२०२० रोजीच्या अर्जान्वये " जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही व दि २७/०७/२०२० रोजीचे अपिलाचे निर्णय व आदेश दिलेले नाहीत " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

- अपिलकारास मानसिक संताप व हानी बद्दल रु. ५०००/- व मालेगाव ते नाशिक आणि नाशिक ते मालेगाव प्रवासाचे ५००/- रुपये देण्याचे आदेश व्हावेत.
- जन माहिती अधिका-यांविरुध्द शास्ती म्हणून दि.०२/०६/२०२० ते माहिती उपलब्ध करुन देण्याच्या तारखेपर्यंत दररोज रु. २५०/- रक्कमेची शास्ती लावावी.
- जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द एम.एस.सी.आर (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या कलम ५ तरतुदी अन्वये शास्ती लावावी.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान जनमाहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते व अन्य पक्षकार अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २९/०५/२०१९ ते दि. २२/०१/२०२० पर्यंतची खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१) जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक यांनी धान्य वितरण अधिकारी मालेगांव यांना दि.२९/०५/२०१९ रोजी क्र.पुरवठा/कक्ष ८(२)/६८२/२०१९ दिले आहे व प्रलंबित आहे हे खरे आहे काय याचा पुराव्याची नकल मिळावी.

२) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मालेगाव धान्य वितरण अधिकारी कार्यालय, मालेगांव विभागातील कर्तव्यात कसुर करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती

कारवाई केली वा येत आहे त्यांचे पुराव्याची संपुर्ण खरी नकल मिळावी, नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत याचे पुराव्याची संपुर्ण खरी नकल मिळावी. मागणी केलेली मागणी केलेली माहिती मुंबई उच्च हायकोर्टात जनहित याचिका दाखल करणेकामी आवश्यक आहे.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र "ब" मध्ये " संपुर्ण कागदपत्रांची खरी नक्कल दिलेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आणुन दिले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०१/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांच्या मुळ माहिती अर्जाचे अनुषंगाने मागणी केलेली माहिती उपलब्ध असून त्याचे पानांक ३३ असून प्रति पान रु.२/- प्रमाणे एकुण रक्कम रु.६६/- इतकी रक्कम हे पत्र मिळाल्यापासून ७ दिवसाच्या भरणा केल्यानंतर आपणास माहिती नियमानुसार पुरविण्यात येईल असे कळविलेले होते.

२) विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आणुन दिले की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२५/०८/२०२० रोजी निर्णय पारीत करुन अपिलार्थी यांना सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून सादर केलेल्या पत्र व्यवहाराची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा आदेश पारीत केला आणि अपिलार्थी यांचा प्रथम अपिल अर्ज निकाली काढला आहे.

३) वरील प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेता व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी ज्या कालावधीत माहितीचा अर्ज केला होता. सदर कालावधी कोव्हिड - १९ चा आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी दि.०१/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती शुल्काचा भरुणा करण्यासंदर्भात कळविलेले होते. परंतु, अपिलार्थी यांनी शुल्क भरलेले नाही. त्यामुळे माहिती पुरविता आलेली नाही असे दिसून येते. अपिलार्थी यांनी माहितीचा शुल्काचा भरणा न केल्यामुळे माहिती न मिळाल्यास ते स्वत: जबाबदार आहेत.

४) विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा गोदाम व्यवस्थापक यांनी दि.०९/०८/२०२३ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांचे मृत्यू प्रमाणपत्र सादर केलेले असून अपिलार्थी हे मयत झालेले असल्याचे निदर्शनास आणुन दिलेले आहे. सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** अपो-५२८ 15 MAR 2024